IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# आधुनिक संस्कृत लेखकांचे स्त्री विषयक दृष्टिकोन

**प्रा. रचना सौरभ शहा**

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*लौकिक, दृष्टिकोन.*

**ABSTRACT**

संस्कृत साहित्य हे जगातील एक वैभवशाली साहित्य आहे .वैदिक साहित्य, लौकिक साहित्य ,आधुनिक साहित्य, यांसारखे विविध विभाग संस्कृत साहित्याचे पडतात.महाकवी कालिदास यांच्यापासून ते आधुनिक कवी कवयित्री अशी साहित्य परंपरा उत्तरोत्तर प्रगतिशील आहे .21 व्या शतकामध्ये देखील संस्कृत भाषा आधुनिक विचारांनी बहरलेली आहे .अनेक कवी कवियत्री नवनवीन विषय जसे की समाजातील विविध घटक विविध समस्या ,स्त्रीशक्ती, इत्यादी. संस्कृत साहित्य हे केवळ परंपरागत न राहता आधुनिकतेला संस्कृत साहित्याने स्वीकारले आहे. समाज,स्त्री, पर्यावरण, नैतिक मुल्ये,मानवता,शांतता ,समता, विश्वबंधुता, राष्ट्रीय एकात्मता असे विविध विषय आधुनिक संस्कृत लेखक आपल्या लेखक लेखनामध्ये मांडताना दिसत आहेत. आधुनिक संस्कृत लेखक यांच्या विषयी आपणास पाहावयास मिळते पण या शोधनिबंधामध्ये मर्यादित स्वरूपात साहित्याचा अभ्यास करून विचार मांडलेले आहेत.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Shah, R. S. (2025). *आधुनिक संस्कृत लेखकांचे स्त्री विषयक दृष्टिकोन.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **834–840**.

संस्कृत साहित्य हे जगातील एक वैभवशाली साहित्य आहे .वैदिक साहित्य, लौकिक साहित्य ,आधुनिक साहित्य, यांसारखे विविध विभाग संस्कृत साहित्याचे पडतात.महाकवी कालिदास यांच्यापासून ते आधुनिक कवी कवयित्री अशी साहित्य परंपरा उत्तरोत्तर प्रगतिशील आहे .21 व्या शतकामध्ये देखील संस्कृत भाषा आधुनिक विचारांनी बहरलेली आहे .अनेक कवी कवियत्री नवनवीन विषय जसे की समाजातील विविध घटक विविध समस्या ,स्त्रीशक्ती, इत्यादी. संस्कृत साहित्य हे केवळ परंपरागत न राहता आधुनिकतेला संस्कृत साहित्याने स्वीकारले आहे. समाज,स्त्री, पर्यावरण, नैतिक मुल्ये,मानवता,शांतता ,समता, विश्वबंधुता, राष्ट्रीय एकात्मता असे विविध विषय आधुनिक संस्कृत लेखक आपल्या लेखक लेखनामध्ये मांडताना दिसत आहेत. आधुनिक संस्कृत लेखक यांच्या विषयी आपणास पाहावयास मिळते पण या शोधनिबंधामध्ये मर्यादित स्वरूपात साहित्याचा अभ्यास करून विचार मांडलेले आहेत.

**संशोधन पद्धती**: वर्णनात्मक संशोधन पद्धती.

**ध्येय आणि उद्दिष्टे**: आधुनिक संस्कृत साहित्याचा परिचय करून घेणे.

आधुनिक संस्कृत साहित्यामधील लेखकांचे स्त्रीविषयक दृष्टिकोन यांचा अभ्यास करणे.

**बीज शब्द** : लौकिक, दृष्टिकोन.

आधुनिक संस्कृत साहित्यामध्ये स्त्रीविषयक दृष्टिकोन यांचा अभ्यास करताना पुढील मुद्दे आपणास दिसून येतात. आधुनिक संस्कृत लेखकांनी पारंपारिक, पतिव्रता ,त्याग ,समर्पण या पलीकडे जाऊन एक स्त्री म्हणून स्वतंत्र व्यक्तीमत्व, तिचे स्वतःचे असे अस्तित्व, संवेदनशीलता , बुद्धिमत्ता,समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची शक्ती अशी एक स्त्रीची प्रतिमा आपल्या साहित्यामधून मांडली आहे.

आधुनिक स्त्री स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव ठेवते. ती कोणाच्याही ओळखीवर अवलंबून राहत नाही. ती प्रश्न विचारणारी आणि विचार करणारी स्त्री आहे. स्त्री जन्म हा केवळ बंधन असे न मानता एक नवनिर्मितीचे ,नवउर्जेचे माध्यम म्हणून आधुनिक स्त्री विचार करते.आधुनिक स्त्री मनाला गुलामगिरीपासून मुक्त करणारी आहे. निर्णय घेण्याची क्षमता तिच्यामध्ये आहे. असे विचार आपल्याला पुढील कवितेतून पहावयास मिळतात. महाश्वेता चतुर्वेदी यांनी आपल्या “काव्यामृतम्”1 या काव्यसंग्रहामध्ये वरील दृष्टिकोन मांडला आहे:

नाहम् छाया कस्यचित् पंथिन: नाहम् मौनं परिभाषितजीवनस्य। स्वप्नेपि प्रश्नान् पृच्छामि निर्भीकम्, अहम् स्त्री स्वस्वरबोधिता।। देह न मे बंधनसूत्रमस्ति, मन:न दासम् परिकल्पना नाम्। निर्णयमार्गे चरामि स्वयम्, अहम् स्त्री नवयुगस्य नायिका।।

कवी कौशल तिवारी आपल्या “द्रुपदात्मजाऽहम्”2 या आपल्या कवितेमधून द्रौपदीच्या मनातील भावना अत्यंत स्पष्टपणे मांडल्या आहेत. द्रौपदी म्हणते , मी जरी द्रुपदाची कन्या असले तरी मला स्वतःचे असे काहीतरी स्वतंत्र अस्तित्व आहे. मी स्वाभिमानी आत्मसजक अशी स्त्री आहे. मी अन्याय सहन करणारी नाही. धर्माच्या नावाखाली अन्याय करणाऱ्यांवर स्त्री ही केवळ वस्तू आहे असे जे समजतात त्यांच्याविरुद्ध टीका करणारी त्यांचा प्रतिकार करणारी अशी मी स्त्री आहे. स्त्री म्हणजे केवळ त्याग नव्हे तर न्यायाची एक चेतना आहे. जे लोक स्त्रियांवर होणारे अत्याचार पाहून मौन धारण करतात, स्त्रियांचे शोषण करतात ,यावर तीव्र प्रहार करणारी आहे .आधुनिक स्त्री अन्यायाला वाचा फोडणारी आहे. आणि जे धर्माच्या नावाखाली पळवाट काढतात, या विरुद्ध देखील ती आवाज उठवते. जी स्त्री सर्व अन्याय कोणत्यातरी अज्ञात सुखाच्या आशेने सहन करत राहते ,त्या स्त्रीबद्दल देखील ती

धिक्कार व्यक्त करते. असा आशय आपल्याला कौशल तिवारी यांच्या कवितेतून पाहावयास मिळतो .आपल्या कवितेमध्ये त्यांनी मौनावर तीव्र टीका व्यक्त केली आहे .स्त्रीच्या आत्मभानाचे आलोचन केले आहे. आधुनिक स्त्री-दृष्टी मांडली आहे. पुरुषप्रधान संस्कृतीवर कठोर प्रहार केले आहेत. कौशल तिवारी यांनी या कवितेद्वारे स्त्रियांच्या आधुनिकतेवर आणि त्यांच्या आत्मपरीक्षणावरती विशेष भर दिला आहे.

आधुनिक कवी बलराम शुक्ल एहि शुभे!3 या कवितेमधून स्त्री ही दैवी आणि लौकिक सौंदर्याहून श्रेष्ठ आहे. स्त्री ही केवळ सौंदर्य वस्तू नसून, ती एक सक्रिय प्रतिमा आहे. स्त्री केवळ सौंदर्य वस्तू नाही तर भावनांची प्रेरणा शक्ती आहे , असा विचार हे मांडतात.

वेदकुमारी या नावाच्या लेखिका आपल्या काव्यामधून बालिकांच्या शिक्षणाबद्दल जागरूकतेचा अभाव जो आजही आपल्याला समाजात दिसतो, त्याविषयी आपले विचार मांडलेले आहेत ते पुढील प्रमाणे:कृषक शिशुभिरुदरपूर्तिः प्राप्तः च चेत् ,श्रमिकबाला यदि शिक्षया वंचिता जीर्ण-शीर्ण कुटीरे हि यदि रोगिणीग्राम्यवनिता चिकित्सा विरहिता मृता।4

कवी बनमाली विश्वाल आपल्या कवितेमध्ये वेश्यावृत्ती बद्दल आपले विचार मांडतात.

“कोऽत्र पापी?जठराग्निं शमयितुं याऽनिच्छया प्रकाश्येन देहं विक्रीणाति अथवा स:देहक्षुधा- निवृत्तये?”5कवी सूचित करतात की—ती स्त्री परिस्थितीची बळी आहे,तिच्या कृतीमागे जठराग्नि (भूक) आहे, वासना नाही.पाप व्यक्तीमध्ये नसून व्यवस्थेत आहे.ही कविता वाचकाला नैतिकतेचा पुनर्विचार करायला भाग पाडते. समाजातील दांभिकतेवर कवीने अतिशय तीव्र टीका या कवितेमधून केल्याची दिसून येते.

डॉ. महाश्वेता त्रिवेदी काव्याऽवमृतम् या त्यांच्या काव्यसंग्रहातील “ देवराला नारीदाह:”6या त्यांच्या कवितेमध्ये देवराला (राजस्थान) येथे एका तरुण स्त्रीचा सती प्रथेमध्ये गेलेल्या बळी बद्दल आपले विचार मांडलेले आहेत. ही कविताआधुनिक काळात घडलेली ही घटना समाजाला हादरवणारी,

परंपरेच्या नावाखाली स्त्रीवर झालेला अमानुष अन्याय याविषयी तीव्र विचार मांडते.देवराला नारीदाहः” हा विषय आधुनिक संस्कृत साहित्यातील मानवतेचा आक्रोश आहे.परंपरेच्या नावाखाली थहोणाऱ्या स्त्रीहिंसेचा तो तीव्र निषेध करतो आणिस्त्रीला मानव म्हणून पाहण्याची नवी दृष्टी देतो.

डॉ. सिमी कंधारी या आधुनिक संस्कृत साहित्यातील समकालीन लेखिका-कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या लेखनात स्त्रीअनुभव, सामाजिक वास्तव, मानवी संवेदना आणि शवैचारिक जागृती यांचे सशक्त दर्शन घडते.डॉ. सिमी कंधारी यांच्या कवितांमधील स्त्री केवळसहनशील नाही, तर विचार करणारी, प्रश्न विचारणारीपरंपरेच्या चौकटीत अडकलेली नसून स्वत्व शोधणारी समाजाच्या अपेक्षांशी संघर्ष करणारी, पण स्वाभिमानी.त्यांच्या काव्यात स्त्री म्हणजे त्यागाचे प्रतीक नव्हे,तर स्वातंत्र्य व आत्मसन्मानाचे सजीव रूप.असा ठाम विचार आढळतो.7

सुश्री वेदकुमारी या आधुनिक संस्कृत कवयित्री असून त्यांची ‘उर्मिः’8 ही कविता आधुनिक स्त्रीसंवेदनांचे सूक्ष्म, प्रतीकात्मक आणि अंतर्मुख रूप दाखवते. “मम हृदि निःशब्दा उर्मिरिव सञ्चरति बाह्यशान्तौ अन्तःकम्पनं वहन्ती।”उर्मिः’ ही कविता आधुनिक संस्कृत साहित्यातील
स्त्री-अंतर्मनाचे प्रभावी प्रतीक आहे.लाटेच्या माध्यमातून कवयित्री स्त्रीच्या दडपलेल्या भावना,
सहनशीलतेमागील अस्वस्थताआणि परिवर्तनाची शक्यता अतिशय सूक्ष्मपणे मांडते.

प्राध्यापक अभिराज राजेंद्र मिश्र यांनी आपल्या लेखनामध्ये नारी विमर्शला एक अभिनय स्थान दिले आहे "भग्नपंजरा:"9 या त्यांच्या रचनेमध्ये त्यांनी एका विधवेची कथा सांगितली आहे .ती पावलोपावली समाजाच्या उपेक्षेची शिकार झाली आहे. इथपर्यंत की जन्मदाते वडील सुद्धा तिला अपमानित करतात. स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतर देखील आपल्या समाजातील लोक शुभकार्यांमध्ये विधवा स्त्रीला अपशकुनी मानतात. डॉ.पुष्पा दीक्षित या आपल्या शांभवी या काव्यसंग्रहामध्ये आपल्या काव्यात मधून समाजातील विविध घटकांवर आपले विचार मांडतात.त्या काव्यसंग्रहामधील "इति शोचति भारतभूमिरियम्" 10 या त्यांच्या कवितेमध्ये भारतभूमीला सजीव माता मानून तिच्या तोंडून समाजसेतीवरती शोक व्यक्त करतात. तर त्याग संयम कर्तव्यनिष्ठा यांपैकी कोणतीच मूल्य समाजात आता उरलेली नाहीत स्वार्थ भोगलालसा आणि केवळ उदरभरण यासाठीच सगळेजण पुढे सरसावले आहेत उच्च ध्यान ऐवजी तात्कालीक लाभांश ची हाव समाजामध्ये वाढत चालली आहे आधुनिक समाजातील नैतिक अदक पद्धत कुटुंब संस्थेचा ऱ्हास स्वार्थ प्रधान वृत्ती आणि मानवी मूल्यांच्या क्षयामुळे भारत भूमी ही शोक व्यक्त करते ही कविता परिवर्तनाचे आवाहन आपल्यासमोर ठेवते. डॉक्टर पुष्पा दीक्षित शांभवी या त्यांच्या गीतिकाव्यामध्ये विविध कविता लिहिलेले आहेत त्यांची "नरास्ते के?"11 या काव्यामध्ये स्त्रीची सार्वजनिक ठिकाणी होणारी छेडछाड तिच्यावर झालेली जबरदस्ती आणि यावर समाजाचा मुख पाठिंबा यावर तीव्र टीका करते: " कुलस्त्री चत्वरे यान्ती बलादाकृष्यते नीचै:। खलानेतान् समामध्ये नुमोदन्ते नरास्ते के"।। याच काव्यात पुढे "सुता: क्षामानना .. या या ओळीमध्ये कवी दीन उपेक्षित स्त्री स्थितीकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाजावर प्रश्नचिन्ह उभे करतात. डॉक्टर पुष्पा दीक्षित यांच्या "ग्रामवधूटी"12या काव्यामध्ये स्त्रीची पराधीनता व व्यक्तिमत्व हरपणे, स्वत्व,दृष्टी, बुद्धी हरवल्याची जाणीव, तिचा झालेला अपमान व उपहास,विरहाने झालेली मानसिक स्थिती, प्रिय कराच्या स्पर्शाने मिळणारे नवजीवन, स्त्रीच्या मनातील प्रेम राज्य, कामिनी भावाची जाणीव,लज्जा व अंतर्गत भावना, श्रान्त ,पीडित स्त्रीला आधाराची गरज, विरहजन्य वेदना,स्त्रीची मौनभाषा, कामबानांनी विद्ध झालेली स्त्री, तिच्या मनातील असुरक्षिततेची भावना, प्रियवियोगावर तीव्र निषेध, स्मृतीतून येणाऱ्या स्पर्शभ्रम ,भावना व्यक्त न होण्याची असहाय्यता या पैलूंवर त्यांनी आपले विचार मांडले आहेत. पुष्पा दीक्षित यांच्याच " प्रियते नो मनो मे"13 या त्यांच्या काव्यात स्त्री ही केवळ सौंदर्याचे किंवा भावुकतेचे प्रतिक नसून ती एक मातृत्व, वात्सल्य ,त्याग आणि भावनिक सुरक्षिततेची एक केंद्रबिंदू म्हणून आपल्या सर्वांसमोर उभी असते .लहानपणापासून संपूर्ण जग प्रेममय वाटते कारण लहानपणी तिच्या जगाच्या केंद्रस्थानी केवळ मातेचे प्रेमच असते,.स्वर्गाच्या इंद्रालाही जे सुख मिळत नाही त्याहून श्रेष्ठ सुरू आईच्या प्रेमामध्ये मिळते असे कवी ठामपणे सांगतात.परंतु काळाच्या ओघात ती माता दूर गेल्यावर किंवा तिचा स्नेहा न मिळाल्यामुळे मनुष्याचे मन विषम आणि कठोर बनल्यामुळे या जगामध्ये रमू शकत नाही.स्वतः कष्ट सोसून दारिद्र्य आणि संकट सहन करूनही जी स्त्री मुलांचे पालन करते ती माता असूनही तिचे ऋण अनेकदा आपण विसरून जातो.ही वेदना कवी स्पष्टपणे व्यक्त करतात.मोठी झालेली मुले पक्षांप्रमाणे घरटे सोडून उडून जातात तेव्हा ती मागे उरते ती एकाकी माता.अशाप्रकारे या काव्यामध्ये स्त्री ही त्या मूर्ती स्नेहाची आधार शीला आणि मानवी जीवनातील सर्वात विश्वासू भावनिक आश्रय म्हणून चित्रित झाली आहे. पुष्पा दीक्षित यांच्याच "कालिका करालिका"14 या कवितेत स्त्रीचे चित्रण पारंपारिक कोमल सौंदर्य प्रधान या स्वरूपामध्ये नसून एक रौद्र संहारक आणि अन्यायाविरोधी आवाज उठवणारी शक्तीरुपी स्त्री या रूपामध्ये त्यांनी वर्णन केलेले आहे येथे कालिका ही भय निर्माण करणारी देवी नसून ती समाजातील अधर्मी,अन्यायी,अज्ञानी आणि स्त्रियांचे शोषण

करणारी मानवी जी प्रवृत्ती आहे तिचा नाश करणारी एक सचेतन शक्ती आहे. कविता वाचल्यानंतर हे स्पष्टच होते की जेव्हा पुरुषप्रधान व्यवस्था धर्मसंस्था राजसत्ता आणि सामाजिक यंत्रणा अपयशी ठरतात तेव्हा स्त्री शक्ती परिवर्तनाची जबाबदारी स्वीकारते निष्पाप कन्यांवर होणारे अत्याचार नीती मार्गावर चालणाऱ्यांचे दमण आणि दुष्ट प्रवृत्तींचे वर्चस्व पाहून कालिका कपाल मालिका धारण करून उठते. हे स्त्रीच्या न्यायप्रवण संघर्षशील आणि जागृत स्वरूपाचे प्रतीक आहे त्यामुळे या कवितेत स्त्री ही सहनशीलतेची बळी नसून अधर्माचा संहार करणारी समाजाला जागे करणारी आणि मानवी चेतना पुन्हा प्रस्थापित करणारी क्रांतिकारक शक्ती म्हणून आपणा सर्वांसमोर उभी राहते. स्त्रियांची ताकद काय असते याची ओळख करून देताना डॉक्टर अनिता मिश्रा लिहितात की ,हे स्त्रियांनो! जागे व्हा. स्त्रियांनो जागे व्हा आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवा! जागर्ति तदा देशो जागर्ति यदा नारी, निद्राति तदा देशो निद्रात यदा नारी |तावद् भवन्ति पुरुषा: धीरा: च शूर वीरा, यावन्न तत्समक्षं समूदेति काऽपि नारी|| पुरुषा :कठोररूपा: पाषाणतुल्यशुष्का:, तान् रसै: स्वकीये: सरसान् करोति नारी| 15

नारी समाजाला उद्बोधन करणाऱ्या सिम्मी कांधारी कवयित्री म्हणतात की “हे स्त्रियांनो! आपल्या अधिकाऱ्यांसाठी तुम्ही जागृत व्हा आणि अन्यायाचा प्रतिकार करा कोणाच्याही भरोशावर राहू नका स्वतःमध्ये चेतनाचा संचार स्वतःच करा.”हे नार्यो ! जागृतदेशोऽयंवाञ्छित नवजागरण।भक्तिं त्यजत दर्शयत शक्तिं भक्त देशहितमरणम्।दुष्ट वधाय समर्था दुर्गा नारी शक्ति समेता,जागृत जागृत नार्यो देशे पुरुषो ढपोरनेता।।16

नागरिका या शीर्षकाची कविता या कवितेमध्ये डॉक्टर सिमी कांधारी आपले स्त्री विषयक विचार मांडताना त्या म्हणतात स्त्रीने नेहमी आपण आपल्या कर्तव्य मार्गावरती चालत राहिले पाहिजे.:स्वदेशे परम्परा: सदैव लालनीया:, देशस्य विधय: सर्वे पालनीया:।

द्रष्टाचारम् देशाद् दूरी करवाणि, कर्त्तव्यपालने सदा रता भवानि।संस्कृता राष्ट्रभाषा भवेद् इयं प्रथमकारिका ! अहं स्वतन्त्रदेशस्य नागरिका!17

नारी तु नारायणी 18या संस्कृत काव्यामध्ये कवी सत्यनारायण पांडेय असे म्हणतात की नारीची निंदा कधीही करू नये कारण नारी ही सगळ्या नरांची जननी आहे नारी ही जगजननी आहे सगळ्यांचे सगळे दुःख हरण करणारी सर्वांना सुख देणारी अशी नारी नारायणी आहे. म्हणजेच कवी सत्यनारायण स्त्रियांचा नेहमी सन्मान केला पाहिजे हाच विचार आपल्या कवितेतून मांडतात. शास्त्री नित्य गोपाल कटारे हे आपल्या प्रथमपतिगृहानुभवम् 19 या कवितेमधून स्त्रीच्या विवाह नतंर जीवनातील भावनिक संक्रमण, सामाजिक अपेक्षा आणि आत्मभान यांचे वास्तववादी व सर्वोदय चित्रण करतात.ही कविता स्त्रीच्या मनातील संवेदना व तिची जुळवून घेण्याची क्षमता अतिशय प्रभावीपणे व्यक्त करते.या कवितेत नवीन नाते स्वीकारताना भीती, कुतूहल, लज्जा आणि आशा असे संमिश्र भाव तीअनुभवत असते.स्वतःची ओळख कशी टिकून ठेवावी.,घराघरात आपले स्थान कसे निर्माण करावे याविषयी प्रयत्नशील असते . विवाह नंतर स्त्रीला पतीच्या घरी आलेल्या सुरुवातीचा अनुभवांचे संवेदनशील चित्रण ही कविता करताना आपल्याला दिसून येते.स्त्रीचा अनुभव हा केवळ बाह्य बदलांचा नसून मानसिक भावनिक आणि सामाजिक संक्रमणाचा आहे माहेरातील मोकळेपणा आपुलकी व सुरक्षितता मागे पडून नव्या घरातील नियम अपेक्षा नाती आणि परंपरा यांना सामोरे जाताना स्त्रीचे मन संकुचित साशंक आणि तरीही जुळवून घेणारे दिसते. राधावल्लभ त्रिपाठी हे आपल्या नवा नायिका 20या काव्यामधून नव्या स्त्री अनुभवाचे सूक्ष्म धाडसी आणि वास्तववादी चित्रण करतात. या कवितेतील नाईका भोगवस्तू नाही तर भोगाची जाणीव ठेवणारी स्वायत्त आणि

सजग स्त्री आहे तिचे शरीर लपवण्याची गोष्ट नाही ते अनुभवाचे माध्यम आहे त्याचवेळी ती दैनंदिन जीवनातील कर्तव्यांपासून तुटलेली नाही ,ही दुहेरी जाणीव आधुनिक स्त्रीचे खरे रूप दाखवते .नवा नायिका या कवितेत परंपरागत नायिकेच्या प्रतिमेला छेद देत अनुभव संपन्न ,व्यवहार कुशल आणि आत्मभान असलेली आधुनिक स्त्री उभी राहते .देह,दैनंदिनता आणि स्वायत्तता यांचे संयमित्व सशक्त चित्रण हेच या काव्याचे वैशिष्ट्य आहे.

वेद कुमारी घई या लेखिका बालिका शिक्षण याविषयी आपले विचार आपल्या कवितेत मांडतात त्या म्हणतात की बालिका शिक्षण आणि तिच्याबद्दलची जागरूकता यांच्या अभावामुळे आजची मानवता आपला श्वास तोडत आहे मानव मानवाचा दुश्मन बनला आहे:

कृषक शिशुभिरुदरपूर्ति: प्राप्त: च चेत्
श्रमिकबाला यदि शिक्षया वंचिता
जीर्ण-शीर्ण कुटीरे हि यदि रोगिणी
ग्राम्यवनिता चिकित्सा विरहिता मृता। 21

उपसंहार: अशाप्रकारे आपण पाहतो की ,आज अनेक लेखक आपल्या साहित्यामधून स्त्री शोषणाविरुद्ध आवाज उठवत आहेत. समाजामध्ये जे काही चांगले वाईट दिसते त्याच विषयांना आपल्या लेखणीतून साहित्यकार लेखन करत आहेत. आधुनिक लेखक यथार्थ लिखाण करण्यापासून घाबरत नाहीत अत्यंत प्रखरपणे जे काही नजरेस पडते तेच आपल्या लिखाणांमध्ये ते उतरवत आहेत. या नारीवादाच्या फलस्वरूप बहुतांशी स्त्रियांना पुरुषांच्या समान अधिकार प्राप्त झालेले आहेत. लोकांच्या मनातील विचारांचे परिवर्तन होण्यास सुरुवात झाली आहे अनेक अंधविश्वास आणि रुढीपरंपरांचा अंत देखील झाला आहे.

**संदर्भसूची**:

1)काव्याऽमृतम्, महाश्वेता त्रिवेदी, श्लोक संख्या 36
20] आधुनिक संस्कृत काव्य की परिक्रमा, डॉ. मंजुलता शर्मा, राष्ट्रीय संस्कृत संस्थान प्रकाशन, नई दिल्ली, पृष्ठ संख्या 75
3) संस्कृत कविता कोश (ऑनलाइन माध्यम), कवी बलराम शुक्ल.
4)आधुनिक संस्कृत काव्य की परिक्रमा, डॉ. मंजुलता शर्मा, राष्ट्रीय संस्कृत संस्थान प्रकाशन, नई दिल्ली, पृष्ठ संख्या 75
5)आधुनिक संस्कृत काव्य की परिक्रमा, डॉ. मंजुलता शर्मा, राष्ट्रीय संस्कृत संस्थान प्रकाशन, नई दिल्ली, पृष्ठ संख्या 77
6)काव्याऽमृतम्, महाश्वेता त्रिवेदी
7) नागरिका, डॉ. सिम्मी कांधारी.
8) गुगल माध्यम, उर्मि:,सुश्री वेदकुमारी.
9) संस्कृत कविता कोश (ऑनलाइन माध्यम), अभिराज राजेंद्र मिश्र
10) शांभवी काव्यसंग्रह, डॉक्टर पुष्पा दीक्षित, पृष्ठसंख्या 2
11)शांभवी काव्यसंग्रह, डॉक्टर पुष्पा दीक्षित, पृष्ठसंख्या 25
12)शांभवी काव्यसंग्रह, डॉक्टर पुष्पा दीक्षित, पृष्ठसंख्या 29

13)शांभवी काव्यसंग्रह, डॉक्टर पुष्पा दीक्षित, पृष्ठसंख्या 36

14)शांभवी काव्यसंग्रह, डॉक्टर पुष्पा दीक्षित, पृष्ठसंख्या 70

15)संस्कृत कवयित्रियों का व्यक्तित्त्व एवं कृतित्व, डॉ. कैलाशनाथ द्विवेदी, जनार्दन प्रकाशन,लखनऊ, प्रथम संस्करण 1997 ई.,पृष्ठ 225

16)संस्कृत कवयित्रियों का व्यक्तित्त्व एवं कृतित्व, डॉ. कैलाशनाथ द्विवेदी, जनार्दन प्रकाशन,लखनऊ, प्रथम संस्करण 1997 ई.,पृष्ठ 225

17)संस्कृत कवयित्रियों का व्यक्तित्त्व एवं कृतित्व, डॉ. कैलाशनाथ द्विवेदी, जनार्दन प्रकाशन,लखनऊ, प्रथम संस्करण 1997 ई.,पृष्ठ 225

18) संस्कृत कविता कोश (ऑनलाइन माध्यम), सत्यनारायण पांडेय.

19) संस्कृत कविता कोश ( ऑनलाइन माध्यम), शास्त्री नित्यगोपाल कटारे.

20) संस्कृत कविता कोश (ऑनलाइन माध्यम), राधावल्लभ त्रिपाठी.

21)आधुनिक संस्कृत काव्य की परिक्रमा, डॉ. मंजुलता शर्मा, राष्ट्रीय संस्कृत संस्थान प्रकाशन, नई दिल्ली, पृष्ठ संख्या 75